**कृपया प्रसिध्दिसाठी** **9 मार्च 2009**

## गेल्या पराभवाची भरपाई करण्याची उत्तर मुंबईकरांना सुवर्ण संधी आली आहे : गोपाळ शेट्टी

**मुंबई, सोमवार :** "गेल्या लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे उट्टे काढायची संधी मतदारांना मिळणार आहे. बोरीवली, दहिसर मधील जनताही नेहमी प्रमाणेच भाजपाच्या बरोबर आहे. आपण मागील पराभवाची भरपाई करण्यासाठी कंबर कसूया," असे आवाहन भारतीय जनता पार्टी मुंबईचे अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी यांनी काल कार्यकर्त्यांना केले. उत्तर मुंबईतील बोरीवली, दहिसर, चारकोप, व मालाड पश्चिम, विधानसभा मतदार संघातील बुथ समित्यांच्या वेगवेगळ्या झालेल्या संमेलनात श्री. शेट्टी बोलत होते.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रत्येक विधानसभा मतदार संघांच्या कार्यकर्त्यांच्या बुथ समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांची संमेलने आयोजित करण्यात येत आहेत. सहा पैकी पाच विधानसभा मंडळांची संमेलने आता झाली असून कांदिवली पूर्व मतदार संघाचे सहावे संमेलन 12 मार्च रोजी होणार आहे. काल महिलादिनी झालेल्या संमेलनात बोलताना श्री. शेट्टी म्हणाले,"उत्तर मुंबई हा भाजपाचा पारंपारिक मतदार संघ आहे. आता चारकोप, दहिसर, बोरीवली या विधानसभा मूळच्या बोरीवली विधानसभेतीलच भाग आहेत. बोरीवलीकरांनी सतत भाजपाला साथ दिली आहे. 1978 पासून सलग तीनदा श्री. राम नाईक त्यानंतर सलग तीनदा श्री. हेमेंद्र मेहता तर आता मी स्वतः बोरीवलीतील भाजपा आमदार म्हणून निवडून आलो आहे. याशिवाय श्री. राम नाईक पाच वेळा याच लोकसभा मतदार संघातून विजयी झाले आहेत. मतदारांचा हा कौल यंदा अधिक भक्कमपणे मिळावा यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक मेहनत घेण्याचा संकल्प करुया. "

महिला दिनी भरलेल्या या संमेलनामध्ये उपस्थित महिला कार्यकर्त्यांना विशेष शुभेच्छा देऊन श्री. राम नाईक म्हणाले," मुंबईच्या महिलांच्या सुविधेसाठी मी महिला विशेष गाडी सुरु करु शकलो याचे मला समाधान आहे. त्याचप्रमाणे महिलांच्या आणि नवजात शिशूंच्या आरोग्याच्या दृष्टीने मी मांडलेले विधेयक लोकसभेत मंजूर केल्यामुळे स्तनपानालाही प्रोत्साहन मिळते आहे. समाजाच्या प्रगतीसाठी महिलांच्या सबलीकरणासाठी नितांत गरज आहे. भाजपाकडेच आज सर्वाधिक महिला खासदार आहेत."

चार विधानसभेतील प्रत्येक संमेलनात शेकडो कार्यकर्ते सामिल झाले होते. चारकोप येथे विधानसभा अध्यक्ष श्री. बाबा सिंह , मालाड पश्चिम येथे श्री. नरेंद्र राठोड , दहिसर येथे श्री. श्रीकांत पांडे तर बोरीवली येथे श्री. मोहन मिठबांवकर हे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. याखेरीज जिल्हा अध्यक्ष श्री. योगेश सागर, उपमहापौर श्री. विनोद घेडिया, मुंबईचे उपाध्यक्षद्वय श्री.जयप्रकाश ठाकूर, श्री.आर.यु.सिंह तसेच नगरसेविका श्रीमती शैलजा गिरकर, कुमारी भारती केणी, नगरसेवक श्री.प्रविण शहा व डॉ.राम बारोट आदींचीही या संमेलनामध्ये भाषणे झाली.

**(कार्यालय सचिव)**